




दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १९२ ●रविवार, दि. २० ऑक्टोबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये


# विधानसभेसाठी पवारांचे संभाव्य ४० शिलेदार ठरले; कुणा-कुणाला लागली उमेदवारीची लॉटरी



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात आता महायुती आणि महाविकास आघाडीचे जागावाटप (चरहरीरीर्हीर ीशालश्रू एश्रशलींळेपी २०२४) अंतिम टप्प्यात आले आहे. दोन्ही आघाड्यांच्या नेत्यांकडून तसा दावा केला जात आहे. महायुतीच्या जागावाटपाची चर्चा वेगाने पुढे सरकत आहे. महाविकास आघाडीकडूनही वेगात हालचाली सुरू झाल्या आहेत. जागावाटप अंतिम टप्प्यात असून काही उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचं सांगण्यात येत आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचेही जवळपास ४० संभाव्य उमेदवार निश्चित झाल्याची माहिती मि ळाली आहे. अद्याप या उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र तिकीट याच शिलेदारांना मिळेल असे सांगण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या संभाव्य उमेदवारांची यादी समोर आली आहे. ४० उमेदवारांची यादी असून यामध्ये कोणत्या मतदारसंघात कोण उमेदवार असणार? याबाबतची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष संभाव्य उमेदवार यादी पुढीलप्रमाणे - तुतारी हाती घेणाऱ्या हर्षवर्धन पाटलांवर मोठी जबाबदारी, शरद पवारांकडून संसदीय बोर्डावर नियुक्ती -

इस्लामपूर- जयंत पाटील
तासगाव कवठे महांकाळ- रोहित पाटील
शिराळा- मानसिंग नाईक
उत्तर कराड- बाळासाहेब पाटील
कोरेगाव- शशिकांत शिंदे
फलटण - दीपक चव्हाण
माण खटाव- प्रभाकर देशमुख
शिरुर- अशोक पवार
जुन्नर- सत्यशील शेरकर
इंदापूर- हर्षवर्धन पाटील
आंबेगाव- देवदत्त निकम
वडगाव शेरी- बापू पठारे
दौंड- रमेश आप्पा थोरात
माळशिरस- उत्तमराव जानकर
कर्जत जामखेड- रोहित पवार
काटोल- अनिल देशमुख
विक्रमगड- सुनील भुसारा
घनसावंगी - राजेश टोपे
बीड- संदीप क्षीरसागर
मुंब्रा- जितेंद्र आव्हाड
जिंतूर- विजय भांबळे
अहेरी- भाग्यश्री अत्राम
सिंदखेड राजा- राजेंद्र शिंगणे

▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात

### निवडणुकीचं तिकिट देतो म्हणून २ कोटींना फसवलं, केंद्रीय मंत्र्याच्या भावाला अटक



**दिल्ली**

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या भावाला पोलिसांनी बंगळुरू पोलिसांनी म हाराष्ट्रातून अटक केली आहे. प्रल्हाद जोशी यांचा भाऊ गोपाल जोशी याच्यासह इतर दोघांवर बंगळुरूत तक्रार दाखल केली होती. जेडीएसचे माजी आमदार देवानंद यांच्या पत्नी सुनिता चव्हाण यांनी फसवणुकीची तक्रार दिली होती. या तक्रारीवरून गोपाल जोशी यांच्यासह तिघांना अटक केलीय.याबाबत मिळालेली माहिती अशी की, लोकसभा निवडणुकीवेळी गोपाल जोशीने महिलेकडून २ कोटी रुपये घेतले होते. पतीला निवडणुकीत तिकिट देऊ असं आश्वासन दिलं होतं. पण तिकीट दिलं नाही. पैसे परत मागितले तेव्हा अपमान केला. पोलिसांनी या प्रकरणी फसवणूक आणि एससीएसटी एक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. महिलेनं दिलेल्या माहितीनुसार गोपाल जोशीने आपला भाऊ केंद्र सरकारमध्ये मोठ्या पदावर असल्याचं सांगितलं होतं.गोपाळ जोशी, त्यांची बहीण विजयालक्ष्मी जोशी आणि गोपाळ यांचा मुलगा अजय जोशी यांच्याविरोधात बसवेश्वरनगर पोलिसांनी गुरुवारी रात्री एफआयआर दाखल केला होता. माजी आमदार देवानंद फुलसिंह चव्हाण यांच्या पत्नीने गोपाळ जोशी यांच्यासह तिघांविरोधात तक्रार दाखल केली होती. दरम्यान, या सर्व प्रकारावर केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनीही खुलासा केला आहे. प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं की, नोव्हेंबर २०१३ मध्ये मी सीटी सिव्हील कोर्ट बंगळुरूत एक गुन्हा दाखल केला होता. त्यात म्हटलं होतं की गोपाल जोशी आणि माझे संबंध २० वर्षांपूर्वीच संपले आहेत. आता ३२ वर्षे झालं आमचा संबंध नाही. माझे फक्त दोन भाऊ आहेत आणि कोणीही बहीण नाही. विजयालक्ष्मी जोशी हिचा माझी बहीण म्हणून उल्लेख पूर्ण चुकीचा आहे.

### 'पंतप्रधान मुद्रा लोन'च्या नावाखाली सोलापुरातील ६00 महिलांची फसवणूक

**सोलापुर । प्रतिनिधी**

'पंतप्रधान मुद्रा लोन' मिळवून देण्याच्या नावाखाली महिला बचतगटातील सुमारे ६०० महिलांची फसवणूक करण्यात आली आहे. फौजदार चावडी पोलीस स्टेशनमध्ये महिलांनी याबाबत फिर्याद दिली असून, फसवणूक करणारी महिला ज्योती रमेश कांबळे ही फरार झाली आहे. यामध्ये शहरातील जवळपास ६०० ते ७०० महिलांची २२ लाखांची फसवणूक केल्याची चर्चा आहे. ज्योती कांबळे ही ग्रामीण भागात राहणारी असून, शहरातील विविध भागात राहणाऱ्या आणि चौकस बुद्धीच्या महिलांनाच तिने गंडविल्याने चर्चेचा विषय झाला आहे. फसवणूक झालेल्या महिलांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या 'लखपती दीदी' योजनाच आहे असे समजून अर्जासाठी प्रत्येकी साडेतीन हजार आणि कागदपत्रांच्या झेरॉक्स दिल्या. यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. सध्या 'लाडकी बहीण योजनेबाबत अनेक तक्रारी सुरू असताना आता मोदींच्या 'लखपती दीदी' योजनेने महिलांना हवालदिल केले आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील तळेहिप्परगे येथे राहणाऱ्या ज्योती रमेश कांबळे हिने पंतप्रधान मुद्रा योजनेतून गृहउद्योगाकरिता एक लाख रुपये मिळवून देते, असे सांगत महिलांना बचतगट स्थापण्यास सांगितले व काही बचतगटातील म हिलांना अवघ्या १५ दिवसांत मुद्रा लोन मिळवून देण्याचे आश्वासन देत आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक घेतले. यावेळी प्रत्येक अर्जासोबत साडेपाच हजार रुपये द्यावे लागतील, असे सांगून त्यातील ३००० रुपये घेतले व उर्वरित रक्कम मुद्रा लोन मंजूर झाल्यानंतर देण्याचे ठरले. कांबळे हिने सोलापुरात जानेवारी २०२४ पासून हा प्रकार सुरू केला होता. ऑक्टोबर उजाडला तरी मुद्रा लोन न मिळाल्याने महिलांमध्ये चर्चा सुरू झाली. शहरातील अनेक भागातून कांबळे हिने महिलांकडून रक्कम उकळली असून, ती २२ लाखांच्या पुढे गेली आहे. याप्रकरणी शुभांगी धनंजय गायकवाड (रा. कोणार्कनगर, जुळे सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. कांबळे या महिलेने मुद्रा योजनेंतर्गत माहिती देताना एक लाख रुपयांच्या कर्जापोटी महिन्याला फक्त एक हजार रुपयांचा हप्ता, २५ हजार रुपयांची सबसिडी असून, फक्त ७५ हजार रुपयेच फेडावे लागतील, असे सांगितले.

## बीडमध्ये विधानसभेचं रणकंदन; महाविकास आघाडी आणि महायुतीचा फॉर्म्युला ठरला, कोणत्या मतदारसंघात कुणाला तिकीट?




**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकांचं बिगुल वाजलं असून राज्यात निवडणुकीचा रणसंग्राम पाहायला मिळत आहे. निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे.

अशातच यंदा राज्यात मुख्य लढत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी दिसून येणार आहे. याच पार्श्वभूमीवर दोन्ही आघाड्यांच्या वतीनं आपापल्या परीनं मोर्चेबांधणी सुरू आहे. अशातच आता महाविकास आघाडीकडून बीड जिल्ह्याचा फॉर्म्युला समोर आला आहे.

बीड जिल्ह्यातील सहा जागांपैकी पाच जागांवर म हाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. तर एका म्हणजे, गेवराई विधानसभा मतदारसंघावर शिवसेना ठाकरे गटानं दावा केला आहे. महाविकास आघाडीकडून परळी विधानसभा मतदारसंघ, केज विधानसभा मतदारसंघ, म ाजलगाव विधानसभा मतदारसंघ, बीड विधानसभा मतदारसंघ आणि आष्टी विधानसभा मतदारसंघ या ठिकाणी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असणार आहेत.

बीडमधील महा विकास आघाडीचे उमेदवार कोण?
बीड विधानसभा मतदारसंघ : संदीप क्षीरसागर
केज विधानसभा मतदारसंघ : अंजली घाडगे
परळी विधानसभा मतदारसंघ : राजेभाऊ फड
आष्टी विधानसभा मतदारसंघ : मेहबूब शेख
माजलगाव विधानसभा मतदारसंघ : रमेश आडसकर

बीड जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार

बीड जिल्ह्यात महायुतीकडून दोन जागेवर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार असतील आणि चार जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार ▶▶ उर्वरित पान २ वर

## राजकीय पक्षाचा झेंडा वाहनांवर परवानगी शिवाय लावता येणार नाही

**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक कालावधीत वाहनांवर लावला जाणारा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही. तसेच निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत इत्यादीच्या संबंधित जागा मालकाचे परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. हे सर्व आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहणार आहेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत जिल्ह्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने काही निर्बंध घातले आहेत. तशा स्वरूपाचे आदेश जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत. राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी, मुद्रणालय मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने, प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव, त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारात नमुना मतपत्रिका छापण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत. प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून दोन फूट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. राजकीय पक्षांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेटस् कटआऊटस, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. वेळेचे बंधन पाळूनच ध्वनीक्षेपकाचा वापर करता येईल ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सकाळी सहा वाजण्यापूर्वी व रात्री दहा नंतर कोणत्याही फिरत्या वाहनांवर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही.

## सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आता मराठीत, सरन्यायाधीशांची महत्त्वपूर्ण घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर न्यायदेवतेच्या मंदिरातही मराठी भाषेची शान वाढणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे मराठी आणि कोकणी भाषेत उपलब्ध केले जातील. देशातील सर्व स्थानिक भाषांमध्ये निकालपत्रे अनुवादित केली जातील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी शनिवारी केली. गोव्यात मेरशी जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकुलाचे उद्घाटन करण्यासाठी सरन्यायाधीश आले होते. उद्घाटन सोहळ्यानंतर त्यांनी राजभवनमध्ये पुस्तक प्रकाशन समारंभाला उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी न्यायनिवाड्यांच्या अनुवादाबाबत घोषणा केली. देशातील न्यायालये लोकांसाठी आहेत. सर्वसामान्य नागरिक न्यायासाठी कोर्टाची पायरी चढतात. त्यांना न्याय मिळायला हवा. त्यांना न्याय देत जाहीर

▶▶ उर्वरित पान २ वर

## ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंना अटक, पंढरपूर न्यायालयात केलं हजर



**पंढरपूर । प्रतिनिधी**

ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांना पंढरपूर पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. पंढरपूर न्यायालयाने हाके यांना जामीन मंजूर केला.

प्राध्यापक लक्ष्मण हाकेंना पंढरपूर पोलिसांनी धनादेश अनादर प्रकरणी अटक केली होती. या प्रकरणात त्यांना आज कोर्टात हजर करण्यात आले.

लक्ष्मण हाके यांनी जामीन मिळाल्यानंतर मात्र आपल्याला अटक झाली नसल्याचा दावा केला आहे. मी जामीन घेतलाच नाही, रेग्युलर कोर्टाची केसची तारीख होती. मध्यंतरी उपोषणामुळे आपली कोर्टाची तारीख चुकली होती. त्यामुळे आजच्या तारखेला हजर झालो. मला अटक झाली नाही असं हाकेंनी सांगितलं.

कोण आहेत लक्ष्मण हाके ?

लक्ष्मण हाके हे आपल्या अनोख्या आंदोलनामुळे नेहमी चर्चेत असतात. त्यांनी ओबीसी संघर्ष सेनेचे अध्यक्ष, ओबीसी व्हीजेएनटी जनमोर्चाचे कार्याध्यक्षपदावर काम केले आहे. तर मागील काही वर्षात अनेक ओबीसी मोर्चे आंदोलनात सक्रिय सहभागी असल्याचे दिसून आले आहे. यात पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर पोतराजच्या वेशात जाऊन लक्षवेधी आंदोलन केले होते.

माढा लोकसभा म तदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांनी महात्मा फुलेंसारखी वेशभुषा करत त्यांच्यासारखे समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले होते. लक्ष्मण हाके हे सांगोला तालुक्यातील जुजारपूर गावचे रहिवासी आहेत. पुणे विद्यापीठातून त्यांनी एमएचं शिक्षण पूर्ण केलं आहे. फर्ग्युसन महाविद्यालयात काही दिवस अध्यापनाचे कामही त्यांनी केले आहे.

## अंतरवलीत हालचाली वाढल्या! मॅनेज होणार नाही, वेळ आल्यावर चिरफाड; जरांगेंचा इशारा



**जालना । प्रतिनिधी**

विधानसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी जरांगेंनी आरक्षण देण्याची मागणी राज्य सरकारकडे केली होती. मात्र, ती पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामुळे आता निवडणुकीत लढायचं की पाडायचं यासाठी अंतिम फैसला आज (दि.२०) अंतरवली सराटीत आयोजित बैठकीत घेतला जाणार आहे.

त्यापूर्वी अंतरवाली सराटीत घडामोडींना वेग आला असून, माझ्या विरोधत कॅम्पेनिंग सुरू असल्याचे मनोज जरांगेंनी म्हटले आहे. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

पत्रकार परिषदेत बोलताना जरांगे म्हणाले की, सध्या माझ्या विरोधात कॅम्पेनिंग सुरू आहे. पण वेळ आल्यानंतर सर्वच गोष्टींची चिरफाड करेल असा इशारा जरांगेंनी दिला आहे. मी पैसा आणि पदांवर फुटणारा नाही असेही जरांगेंनी स्पष्ट केले. माझ्याविरोधात कॅम्पेनिंगसाठी ग्रुप करण्यात आल्याचे जरांगे म्हणाले. पण असं करून काही होणार नाही. वेळ आल्यावर या सर्व गोष्टीची चिरफाड होईल असा थेट इशारा जरांगेंनी दिला.

पुढे बोलताना जरांगे म्हणाले की, वेळ आली तर समाजासाठी मरेल सरकारकडे आणि विरोधकांकडे शेवटच अस्त्र तेच आहे. मला एकतर मारून टाकावं लागेल किंवा मी मरेल पण मी काही पैशांवर आणि पदांवर फ ुटू शकत नाही. माझ्याविरोधात जवळच्यांना जर तुम्ही डाग लावण्याचा प्रयत्न केला असेल तर, ▶▶ उर्वरित पान २ वर

संपादकीय...

## जरांगे पाटील यांनी प्रचंड मेहनत केली, पण एक चुकीचा निर्णय त्यांचा 'अण्णा हजारे' करून जाईल



एका बाजूला मराठा आरक्षणाचा विषय आणि दुसऱ्या बाजूला जाहीर झालेल्या विधानसभा निवडणुका असे दोन विषय समोरासमोर आल्याने सर्वच राजकीय पक्ष चिंतेत आहेत. तसेच मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील नेमकी कोणती भूमिका घेणार यावर देखील सर्वाचं लक्ष आहे. पण मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे सर्वाधिक लक्ष आहे ते सत्ताधारी पक्षाचे आणि विशेष करून भारतीय जनता पक्षाचे, असं म्हटलं जातंय. मनोज जरांगे पाटील यांची भूमिका विधानसभेत नेमकं कोणाचं नुकसान करणार याबद्दल कोणीही १००% खात्रीने काहीच सांगू शकत नाहीत, पण अनुभवातून काही अंदाज नक्कीच व्यक्त करता येऊ शकतो. मनोज जरांगे-पाटील यांनी उद्या म्हणजे २० ऑक्टोबर रोजी आंतरवली सराटीत बैठक घेऊन उमेदवारांना पाडायचे की आपले स्वतःचे उमेदवार उभे करायचे याबाबत निर्णय घेणार आहे. माझा समाज माझ्यासोबत आहे, मला पुन्हा पुन्हा शक्ती प्रदर्शन करायची काहीही गरज नाही.

विरोध करणाऱ्या लोकांची तोंड दसरा मेळावा आणि तिथे जमलेला जनसागर पाहून बंद झाली असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांना सांगितले. मराठा समाज भाजपात मोठ्या प्रमाणात आहेत. भाजप पक्षातील मराठ्यांना सुद्धा वाटत होते की देवेंद्र फडणवीस न्याय देतील. परंतू फडणवीसांनी इतर काही जातींना ओबीसीत घातले, परंतू मराठ्यांना नाही, हे पाहून भाजप पक्षातील मराठे देखील नाराज झाले आहेत असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

फडणवीसांनी यांनी मराठ्यांच्या तोंडाशी आलेला घास घालवला असल्याची टीकाही मनोज जरांगे-पाटील यांनी केली आहे. मराठ्यांची लेकरंच जर जगली नाहीत तर नेत्याला मोठा करुन काय करायचं, नेत्यांची पोरं परदेशात शिकत आहेत. पण या लोकांमुळेच नाईलाजाने मला राजकारण शिकावं लागलं आहे, असे देखील मनोज जरांगे पाटील म्हणाले. पण आता पुढे काय? मनोज जरांगे-पाटील यांनी उद्या म्हणजे २० ऑक्टोबर रोजी आंतरवली सराटीत बैठक घेऊन उमेदवारांना पाडायचे की आपले स्वतः चे उमेदवार उभे करायचे याबाबत निर्णय घेणार आहे. या विषयाला अनुसरून राजकीय विश्लेषकांनी त्याची मतं व्यक्त केली आहेत. अनेक भाजप नेत्यांसोबत ऑफ कॅमेरा बोलताना सांगत आहेत की, जरांगे-पाटील यांनी उमेदवार उभे करावेत अशी भाजपाची इच्छा आहे, कारण त्याचा फटका सर्वांनाच बसले, पण सर्वात कमी फटका आणि अधिक फायदा भाजपाला होईल असं भाजपच्या श्रेष्ठींना वाटतंय. या विधानसभा निवडणुकीत मत विभागणी हाच निर्णायक मुद्दा ठरणार आहे. जरांगे-पाटील यांनी उमेदवार दिल्यास, उमेदवारीच्या विषयामुळे आपसात भांडणं आणि एकमेकांच्या विरोधातील वक्तव्य मूळ आरक्षणाच्या विषयावरच घाव घालू शकतात असं राजकीय विश्लेषकांना वाटतंय. तसेच उमेदवारीवरून जरांगे-पाटील यांच्या विरोधात एक गट निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येतेय. तसेच जर उमेदवार निवडून आले नाही किंवा मोठ्या प्रमाणात पराभूत झाल्यास, त्यानंतर होणारे तंटे देखील आरक्षणाला मारक ठरू शकतात. आणि मराठयांनी एकमेकांना पाडलं असा संदेश जाईल... समजा जरी काही निवडून आले तर ते राजकीय दृष्ट्या विकले जाणार नाहीत किंवा सत्तेच्या मागे धावणार नाहीत याची खात्री कोणीही देऊ शकत नाही. त्यामुळे उमेदवार देणं मूळ आरक्षणाच्या हेतूला धक्का देईल. कारण, एकदा निर्णय चुकला तर अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस जरांगेचा पूर्ण कार्यक्रम करतील असं देखील राजकीय विश्लेषक सांगत आहेत. कारण, जरांगे यांच्या चुकीच्या निर्णयामुळेच अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस अधिक मजबूत होतील असं म्हटलं जातंय.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तिसऱ्या आघाडीचे नेते सुद्धा जरांगे-पाटील यांच्यासोबत फोटो काढण्यास उत्सुक असल्याचं पाहायला मिळतंय. राजू शेवटी वगळल्यास तिसऱ्या आघाडीचे नेते भाजपच्या जवळचे असल्याने त्यांचा हेतू केवळ 'वोट कटवा' पक्ष म्हणून होऊ लागला आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर एखादा निवडून आला तरी तो पुन्हा जरांगे-पाटील यांच्या आजूबाजूला सुद्धा फिरकताना दिसणार नाही असं राजकीय विश्लेषक अंदाज व्यक्त करत आहेत. अण्णा हजारे यांनी काही वर्षांपूर्वी मोठं आंदोलन केलं होतं, पण आज अण्णा हजारे नेमके कुठे आहेत हाच प्रश्न विचारला जातो. कारण, २०१४ सत्तेत आलेल्या भाजपने त्यांचा पूर्ण कार्यक्रम केला हा मागील अनुभव आहे. उद्या मनोज जरांगे पाटील यांचा सुद्धा 'अण्णा हजारे' होईल याची चर्चा समाज माध्यमांवर सुरु झाली आहे. आणि त्याच कारण म्हणजे, त्यांनी घेतलेल्या निर्णयाने भाजपचा फायद्या होणार की नुकसान यावर सगळं अवलंबून आहे.

केंद्रात भाजपकडे बहुमत नाही आणि महाराष्ट्रात सुद्धा भाजप सत्तेतून बाहेर गेल्यास फडणवीस सुद्धा राजकीयदृष्ट्या अडचणीत येतील असं म्हटलं जातंय. तसं झाल्यास सर्वच नेते जरांगे-पाटील यांचा धसका घेतील. पण मनोज जरांगे-पाटील यांच्या कोणत्याही चुकीच्या निर्णयाने भाजप मजबूत झाली, तर अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस सुद्धा मजबूत होतील. त्यानंतर मात्र मनोज जरांगे-पाटील यांचं काही खरं नाही, असं राजकीय विश्लेषक मत व्यक्त करत आहेत. कारण डखढ सारख्या धमक्या त्यांना आधीच दिल्या गेल्या होत्या.

मनोज जरांगे-पाटील यांच्याकडे सर्वात मोठं एकमेव अस्त्र आहे आणि ते म्हणजे 'उमेदवारांना पाडा. कारण हेच अस्त्र निवडणुकीच्या निकालानंतरही प्रभावी राहील आणि समाज सुद्धा एकत्र राहील. परिणामी, मूळ आरक्षणासाठी येणारं नवं सरकार सुद्धा प्रचंड दबावाखाली राहील. अन्यथा जरांगे यांच्या चुकीच्या निर्णयाने सर्वकाही संपुष्टात येऊ शकतं आणि नंतर कितीही आंदोलनं करा, कोणीही बघणार नाही. त्यामुळे उद्या मनोज जरांगे-पाटील कोणता निर्णय घेणार ते पाहावं लागणार आहे.

# पदवीधरांसाठी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये नोकरी

पदवीधर असून चांगल्या पगाराची नोकरी शोधत असाल तर तुमच्यासाठी ही महत्वाची अपडेट आहे. बँकेत नोकरी करायची असेल तर आधी त्यासंदर्भातील शिक्षण आवश्यक आहे. शिकता शिकता तुम्हाला जर कोणी पगारही देत असेल तर आणखी काय हवं?

बँक ऑफ महाराष्ट्र तुम्हाला ही संधी देत आहे. येथे देशभरातून ६०० शिकाऊ पदांसाठी अर्ज मागवले आहेत. पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अर्जाची शेवटची तारीख, स्टायपेंड याचा सविस्तर तपशील देण्यात आला आहे. अधिकृत वेबसाइटवर याची माहिती देण्यात आली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये शिकाऊ पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून कोणत्याही विषयात पदवी पूर्ण केलेली असावी.ज्या राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशात प्रशिक्षणार्थी निवड केली जाईल त्या स्थानिक भाषेचे चांगले ज्ञान संबंधित उमेदवाराला असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील उमेदवारांना मराठी भाषणा येणे आवश्यक आहे. अर्ज करतावेळी उमेदवाराने दहावी किंवा बारावीचे प्रमाणपत्र सोबत जोडावे लागेल.

कसा करायचा अर्ज?



बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये शिकाऊ पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सर्वप्रथम अधिकृत वेबसाइट https://nats.education.gov.in/ da Omdo. येथे जाऊन राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजना (NTS) पोर्टलवर नोंदणी करावी. छ्ढड पोर्टलवर प्रोफाइल पूर्ण भरावे. प्रोफाइल पूर्ण असलेले उमेदवारच बँक ऑफ महाराष्ट्र अप्रेंटिसशिप प्रोग्रामसाठी अर्ज करण्यास पात्र असतील, याची नोंद घ्या.

अर्जदाराचे वय किती असावे?

३० जून २०२४ रोजी अर्जदारांचे वय २० ते २८ वर्षांच्या दरम्यान असावे.

किती मिळेल स्टायपेंड?

अप्रेंटीस पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराल एका वर्षाच्या कालावधीसाठी काम करता येईल. या कालावधीसाठी उमेदवारांना दरमहा ९ हजार रुपये स्टायपेंड मिळेल. उमेदवारांना या स्टायपेंड व्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त लाभ किंवा भत्ते दिले जाणार नाहीत.

अर्ज शुल्क

शिकाऊ पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना अनारक्षित, ईडब्ल्यूएस आणि ओबीसी उमेदवारांना १५० रुपये अर्ज शुल्क अधिक GST भरावा लागेल. एससी, एसटी श्रेणीतील उमेदवारांना अर्ज शुल्कात ५० रुपयांची सवलत देण्यात येणार आहे. या उमेदवारांना १०० रुपये अर्ज शुल्क अधिक ऋड्ढ भरावा लागेल. पीडब्ल्यूबीडी श्रेणीतील उमेदवारांना अर्ज शुल्कात सवलत देण्यात आली आहे. त्यांच्याकडून कोणतेही अर्ज शुल्क नाही.

कुठे पाठवाल अर्ज?

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये अप्रेंटीस पदासाठी इच्छुक आणि पात्र उमेदवार अधिकृत वेबसाइट लरपज्ञेषारहरीरीहीीर.ळप वर जाऊन त्यांचे अर्ज ऑनलाइन सबमिट करू शकतात.

अर्जाची शेवटची तारीख?

वेबसाइटवरील अर्ज करण्याची विंडो २४ ऑक्टोबर २०२४ रोजी बंद होईल. यानंतर उमेदवारांना अर्ज करता येणार नाही. अर्ज करण्यापुर्वी उमेदवारांनी नोटिफिकेशन काळजीपूर्वक वाचावे. अर्जात काही त्रुटी असल्यास किंवा अपूर्ण अर्ज असल्यास तो बाद करण्यात येईल, याची नोंद घ्या.

पान १ वरून पुढे.....

## विधानसभेसाठी पवारांचे...

उदगीर- सुधाकर भालेराव
घाटकोपर पूर्व- राखी जाधव
परळी- राजाभाऊ पड
लक्ष्मण पवार- गेवराई
आष्टी- भीमराव धोंडे
केज- पृथ्वीराज साठे
माजलगाव- रमेश आडसकर
राहुरी- प्राजक्त तनपुरे
देवळाली- योगेश घोलप
दिंडोरी - गोकुळ झिरवाळ
मुक्ताईनगर - रोहिणी खडसे
जामनेर- गुलाबराव देवकर
अकोला- अमित भांगरे
पारनेर- राणी लंके
खानापूर - सदाशिव पाटील
चंदगड- नंदाताई बाभूळकर
इचलकरंजी- मदन कारंडे

## बीडमध्ये विधानसभेचं ..

गटाचे उमेदवार असतील. बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघ आणि केज विधानसभा मतदारसंघ मधून भाजपचे उमेदवार महायुतीकडून निवडणूक लढवतील. तर, अजित पवार गटाकडून बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे चार उमेदवार असतील माजलगाव विधानसभा मतदारसंघ गेवराई विधानसभा मतदारसंघ परळी विधानसभा मतदारसंघ आणि बीड विधानसभा मतदारसंघ या ठिकाणी अजित पवार गटाचे उमेदवार पाहायला मिळतील.

बीड जिल्ह्यातील महायुतीचे संभाव्य उमेदवार

परळी विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : धनंजय मुंडे

माजलगाव विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : प्रकाश सोळंके

बीड विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : योगेश शिरसागर

गेवराई विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : विजयसिंह पंडित

## सर्वोच्च न्यायालयाचे निकाल...

केलेली निकालपत्रे सामान्य पक्षकारांना समजली पाहिजेत. याच अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे मराठी व कोकणी भाषेतही उपलब्ध केले जातील, असे डॉ. चंद्रचूड यांनी जाहीर केले.

३७ हजार निवाडे हिंदीमध्ये अनुवादित इंग्रजी भाषा समजणे सामान्य पक्षकारांना अवघड जाते. ही अडचण लक्षात घेऊन देशातील स्थानिक भाषांमध्ये निकालपत्रे अनुवादित केली जात असल्याचे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयाचे तब्बल ३७ हजार निवाडे हिंदीमध्ये अनुवादित केले आहेत. स्थानिक भाषांमध्ये न्यायनिवाडे अनुवादित करून एक नवीन संदेश देत आहोत, असे त्यांनी नमूद केले.

सर्वोच्च न्यायालयाने लोकन्यायालय म्हणून भूमिका बजावावी. भविष्यात तशीच भूमिका कायम ठेवली पाहिजे. मात्र न्यायालयांनी संसदेतील विरोधी पक्षाची जागा घेऊ नये. सर्वोच्च न्यायालयाने मागील ७५ वर्षांत न्यायदानाचा चांगला आदर्श निर्माण केला आहे. हा आदर्श गमावता कामा नये, असे मत सरन्यायाधीश डॉ. चंद्रचूड यांनी दक्षिण गोव्यात सुप्रीम कोर्ट ॲडव्होकेट्स ऑन रेकॉर्ड असोसिएशनच्या परिषदेत बोलताना व्यक्त केले.

## अंतरवलीत हालचाली..

घेणार आणि देणारा दोघेही संपणार असे जरांगे म्हणाले.

अंतरवलीत आज निर्णयक बैठक होणार असून, या बैठकीत उमेदवार पाडायचा की लढवायचा याचा अंतिम निर्णय होणार आहे. आमचे उमेदवार कुठेही जाणार नाही. लढायचं ठरलं तर माझ्यासाठी आणि माझ्या समाजासाठी वेळ कमी नाही. मात्र, समोरच्यांसाठी कमी आहे. महायुती आणि महाविकास आघाडीकडे टफ उमेदवार आहेत. पण जरी टफ असले तरी उमेदवार द्यायचा एकच आहे. त्यामुळे त्यांची गणितं कशी आहे हे बघण्यासाठी आम्हालाही त्यांची यादी बघायची असल्याचे सांगत आमचे कितीही उमेदवार असले तरी ते तिकडे जात नाहीत असा विश्वासही जरांगेंनी बोलून दाखवला.

पान ४ वरून पुढे.....

## भटक्या - विमुक्त मागासवर्गीय...

शाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शाहु महाराज, महात्मा फुले यांच्या सारखे थोर महापुरुष अत्यंत कष्टातून पुढे येत त्यांनी देश आणि जागतिक पातळीवर नावलौकिक केले. आज समाजातील सर्व घटकांसाठी त्यांचे विचार प्रेरणादायी आहेत. गोरगरिबांनी चांगले शिक्षण घेतले तर त्यांना निश्चितच फायदा होईल. जागतिक पातळीवर आष्टीचे नावलौकिक करणाऱ्या धावपटू अविनाश साबळे यांचे त्यांनी उदाहरण दिले. अविनाश साबळेचा तरुणांनी आदर्श घ्यावा. कोणत्याही निवडणुकीत स्वाभिमान विकू नका, मागास घटकांसाठी शासनाच्या भरपूर योजना आहेत त्यांचा लाभ घ्या. शिक्षण घेताना गोरगरिबांना सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती मिळतात तसेच परदेशात जाण्यासाठी ही शिष्यवृत्ती मिळते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन या योजनेचा लाभ घ्यायला पाहिजे म्हणजे गोरगरीबांचे विद्यार्थी उच्चशिक्षित होतील. भाजपाचे आष्टी तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के यांनी सांगितले की, माजी आ. भीमराव धोंडे यांनी कधीही जातीयवाद केला नाही. २०१४ मध्ये भिमराव धोंडे आमदार असताना हजारों गोरगरिबांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून दिला. तसेच मागच्या विधानसभेला व कालच्या लोकसभेला जवळच्या लोकांनी समोरून नाही तर पाठीमागून घात करीत पराभव केला. युवा नेते अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, या निवडणुकीत धोंडे साहेब सर्व ताकदीनिशी उतरणार आहेत त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी आणि मतदारांनी साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे. २०१४ ते २०१९ या काळात मतदारसंघाचा प्रचंड विकास केला आहे. ड. रत्नदीप निकाळजे यांनी सांगितले की माजी आ. भीमराव धोंडे म्हणजे विकासाभिमुख नेतृत्व आहेत मतदारसंघातील सर्व गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठी त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो त्यामुळे तळागाळातील लोकांनी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी सांगितले की, मा. आ. भिमराव धोंडे यांनी कधी जातीपातीचे राजकारण केले नाही. मतदारसंघातील गोरगरीब जनता आणि तळागाळातील लोकांच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले. त्यामुळे आज एवढ्या प्रचंड संख्येने समाज आला आहे.

भिमराव धोंडे हे खरोखरच गोरगरीबांचे नेते आहेत. याप्रसंगी राजपाल शेंडगे, बालाजी भोसले, दीपक बोराडे, अनिल गजघाट, शंकरराव देशमुख, युवराज सोनवणे, अडागळे, सुनील शिंदे व इतरांची भाषणे झाली. यावेळी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील खंडू गिरी, बाबासाहेब ससाणे, बाबासाहेब शिरोळे, गौतम ससाणे, माजी सभापती अनिल जायभाय, सरपंच शशिकला चंदनशिव, माऊली कांबळे, जालिंदर पंडागळे, सुदाम वाघमारे, सुभाष कांबळे, ग्रा.पं. सदस्य आदेश निमोणकर, अभिलाष गाडेकर, बाळासाहेब शिरोळे, नानासाहेब डिडोळ, शंकर बर्डे, प्रविण देवडे, विलास जावळे, आस्ताकभाई शेख, आनंद जावळे, बापु वाल्हेकर, सर्जेराव वाघमारे, सर्जेराव तुपे, सनी काळपुंड, हमिद पठाण, विकास वनवे, छबुताई गायकवाड व इतरांची उपस्थिती होती. मेळाव्याला मतदारसंघातील महिला देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मेळाव्याला मतदारसंघातील पारधी, भिल्ल, तिरमल, मातंग, हरिजन, गोसावी, चांभार, वडार, कैकाडी व इतर जाती जमातीतील ग्रामस्थ आणि महिला उपस्थित होत्या. यावेळी सुमारे पाच हजारांहून अधिकचा जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश दिवटे यांनी केले.कार्यक्रम संपल्यानंतर चार चाकी बाहेर काढण्यासाठी खडकत रोडवरील लक्ष्मी लॉन ते आष्टी पर्यंत ट्रॅफिक जाम झाली होती एवढ्या मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहने आली होती.

## व्यापाऱ्यांना ठामपणे संरक्षण देण्याचं...

सुरू आहे.त्याचा कायापालट करण्याचं काम मी केलं.देवस्थानाला १९ एकर जमीन होती आता १५० एकर जमीन झाली.आष्टी तालुक्यात सव्वादोन टीएमसी पाणी मी आणून दाखविले आहे.वेळ आली की ते पुराव्यासह तुमच्यासमोर सिध्द करून दाखवणार आहे.५८ टी एम सी जे पाणी आलेलं आहे ते भविष्यामध्ये पाटोदा आणि शिरूर तालुक्याला वळवणार हा प्रामाणिकपणे शब्द तुम्हाला देतो म्हणत माझा मोबाईल दिवस रात्र माझ्या जवळ असतो कारण कधी कुणाची काय अडचण असेल ती सांगता येत नाही परंतु एक सांगतो ज्या दिवशी मोबाईल बंद करील हॉल मध्ये ठेवीन त्या दिवशी मी माझ राजकारण बंद करीन.रात्रंदिवस झटाव लागतं तेव्हा माणसं जमतात.स्वतःच्या स्वार्थासाठी काही जण जातीपातीचे राजकारण करू पाहत आहेत ही जनता माझ्या पाठीशी आहे तो पर्यंत मी कशालाच घाबरत नाही असे शेवटी धस म्हणाले.यावेळी हजारो व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काकू-नाना प्रतिष्ठानचा...

डॉ.विश्वजीत बोंडार, डॉ.आनंद दाभाडे, डॉ.योगेश धुमक यांच्या समन्वयातून राबवण्यात आले. याशिवास गावातील बबन साठे, बाळासाहेब मुळे, भीमराव साठे, रमेश हागारे, सुनंदा मुळे, योगेश साठे, अशोक काटे, गणेश साठे, राजेश मुळे, बब्रुवान मुळे, सचिन हागारे यांनी शिबिरासाठी विशेष सहकार्य केले.

## न लढल्यास भाजपचा...

आहे. आताही तशीच परिस्थिती आहे, पण वेळ मात्र निर्वाणीची आहे. कारण लोकसभा न लढून चालले, पण आता विधानसभा न लढून चालणार नाही. कारण लोकसभा न लढवल्यामुळे ज्यांना त्याचा फायदा झाला त्या महाविकास आघाडीतील एकही नेता त्यांच्या विजयाचे श्रेय जरांगे पाटलांना द्यायला तयार नाही.शिवाय उलट महाविकास आघाडी संधी साधून नव्या जोमाने मराठा समाजाबरोबर बेईमानी करायला सरसावली असल्याचेच दिसत आहे.पण त्यामुळे, महायुती व महाविकास आघाडी मधील फरक स्पष्टपणे दिसून येत आहे.कपटी मित्रापेक्षा दिलदार शत्रू बरा असे आता महाविकास आघाडी व भाजप बाबत म्हणता येऊ शकते.

कारण, देवेंद्र फडणवीस माझ्या पक्षाचा डीएनए ओबीसीचा आहे असे २०२१ पासून म्हणजे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर व त्यांनी मराठा समाजाला २०१८ मध्ये दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर सातत्याने व खूप अभिमानाने म्हणत आले आहेत.मनोज जरांगे पाटलांचे आंदोलन उभे राहिल्यानंतरही त्यांनी तसे म्हणण्यात कधी खंड पडू दिलेला नाही.आम्ही प्रथम हिंदुत्ववादी आहोत व त्यानंतर ओबीसीवादी आहोत.मराठ्यांचे विरोधक नसलो तरी आम्ही कुठल्याही प्रकारे मराठावादी किंवा मराठ्यांचे हितचिंतक मात्र निश्चितपणे नाहीत असेच त्यांना म्हणायचे आहे,जे त्यांनी कधीच लपवण्याचा प्रयत्न केलेला नाही. आणि ते मराठाविरोधी आहेत असा आरोप झाल्यानंतरही त्याचा निखालस खुलासा करण्याच्या भानगडीतही ते मुद्दामहून कधी पडले नाहीत,कारण त्यांना तेच हवे होते,हे मनोज जरांगे पाटलांनी लक्षात घ्यायला हवे.तसेच हे ते सगळं यासाठी करत आहेत की त्यांची सगळी मदार ओबीसी वरती आहे.व त्यासाठी त्यांनी मराठ्यांना १०% आरक्षण देऊन फसवूनही दाखवलेले आहे. त्यामुळे असे म्हणतात की ओबीसी समाजामध्ये आता फडणवीसांबद्दल खूप आदराची भावना आहे. व आपले फडणवीस असा उल्लेख फडणवीसांचा ओबीसींकडून आता केला जातो, जे फडणवीस हे फक्त ओबीसीहितैशी असल्याचेच निदर्शक आहे.कारण आजपर्यंत दोन वेळा केवळ ओबीसींसाठी त्यांनी मराठा समाजाला आरक्षण देऊन फसवलेले आहे.ही मोठी कर्तबगारी देवेंद्र फडणवीसांनी ओबीसींसाठी दाखवलेली आहे. तर दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडी व तिचे खा शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले व विजय वडट्टिवार सारखे चतुर नेते आहेत.या सगळ्यांच्या व्यक्तिमत्वांवरून समाजाशी शिताफीने व धूर्तपणे बेईमानी करण्याचे कौशल्य व कृतघ्नपणाचे प्रदर्शन सहजपणे करण्याची हातोटी महाविकास आघाडीच्या नेत्यांकडे महायुतीच्या नेत्यांपेक्षा खूप अधिक प्रमाणात आहे, हेच दिसून येते,जे कोणीही नाकारू शकत नाही.त्यामुळे महाविकास आघाडीचा फायदा होईल अशी भूमिका जरांगे पाटलांना आता घेताच येणार नाही.सोबतच देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल अपशब्द काढताना एकनाथ शिंदेचे कौतुक करणे व अजित पवारांचा नामोल्लेखही टाळणे बऱ्याच लोकांना पक्षपातीपणाचे वाटते, याकडेही जरांगे पाटलांनी लक्ष दिलेले बरे! कारण एकनाथ शिंदेंमुळे कुणबी प्रमाणपत्राचे वाटप होऊ लागले या कारणासाठी जर त्यांना सहानुभूती दाखवली जात असेल तर तिला गैरच म्हणावे लागेल. कारण स्वप्नातही नसलेले मुख्यमंत्री पद एकनाथ शिंदे यांना ते केवळ मराठा असल्यामुळेच भेटलेले आहे,व शिवसेनेसारख्या पक्षामध्ये उभी फूट पाडूनही त्यांचे राजकीय जीवन सुरक्षित राहिले आहे, ते केवळ ते मराठा असल्यामुळे.पण जातीचे इतके मोठे लाभार्थी असूनही व महाराजांची शपथ घेऊनही,ओबीसीतुन आरक्षण देण्याचे धारिष्ट्य मात्र एकनाथ शिंदे दाखवू शकले नाहीत, ही त्यांची दुर्बलता समाजासाठी खूप लाजिरवाणी आहे.शिवाय आपल्या या लज्जास्पद दुबळेपणाचे प्रदर्शन, मी कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देणारच!, असे ठासून सांगत आजही ते करत आहेत, जे खूप संतापजनक आहे. त्यामुळे फडणवीसांच्या भाजपचा सूपडासाफ करताना महाविकास आघाडी व एकनाथ शिंदे,अजित पवार यांना मदत होईल अशी भूमिका जरांगे पाटील यांनी घेता कामा नये.म्हणून विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेणे व तोही कोणत्याही पक्षाशी किंवा नेत्याशी आघाडी किंवा युती न करता घेणे हाच जरांगे पाटलांच्या आंदोलनासाठी योग्य पर्याय आहे. कारण आता निवडणूक लढवणे हेच जरांगे पाटील यांच्यासाठी आंदोलन असू शकते.तसेच लोकांना लढणाराच नेता आवडतो, परिणामांस भिऊन न लढण्याची भूमिका घेणारा नेता लोकांना आवडत नाही.शिवाय, लढायचे की पाडायचे? याचा निर्णय घेऊ असे पाटील म्हणतात.पण असे करता येत नसते.कारण लढण्याच्या निर्णयामध्येच पाडण्याचा निर्णय अंतर्भूत असतो. नुसत्या पाडण्याचा निर्णय घेण्याच्या मुळाशी आपलेपणा व परकेपणा असा भेदभाव दिसतो.पण खऱ्याने तर गरजवंत मराठ्यांना कोणीच आपले नाही हे ओळखून मनोज जरांगे पाटलांनी निवडणूक लढवण्याचा गाभीर्याने विचार करावा, म्हणजे त्यांच्या लक्षात येईल की निवडणूक लढवणे हाच आपल्यासाठी सर्वोत्तम पर्याय आहे.शिवाय,राज्यात सहा कोटींच्या संख्येने असलेला मराठा समाज किती प्रमाणात एकजूट झाला आहे ते सुद्धा निवडणूक लढल्यावरच कळू शकते.कारण,आजपर्यंत नेत्यांच्या सभेला प्रचंड संख्येने आलेल्या लोकांनी मतदान मात्र केलेले दिसलेले नाही. म्हणून मराठा समाजामध्ये काही बदल झालाय की नाही? की,आजही तो प्रस्थापितांच्याच प्रभावाखाली आहे,हेही कळणे खूप गरजेचे आहे,असे प्रसिध्द केलेल्या पत्रकातून शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

महत्वाचे

## माहेश्वरी सभेकडून हजारो रुग्णांना मोफत दम्याचे औषध वाटप



**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही दि १६रोजी शहरतील राजस्थानी मंगल कार्यालय येथे प्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व. चंदूलालजी कंलंत्री यांच्या दमा औषधीचे सुमारे १५०० रुग्णांना मोफत वाटप माहेश्वरी सभेच्या वतीने तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया व सर्व समाज बांधव यानी यशस्वी रित्या केले. तेलगाव येथील सुप्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कलत्री यांचे दमा या आजारवरील औषधचे वाटप मागील १८ वर्षांपासून माजलगाव तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी करण्यात येते यावर्षी कोजागिरी पौर्णिमे १५ ऑक्टोबर बुधवार रोजी शहरातील राजस्थानी मंगल कार्यालय येथे रात्री १२वाजता कोजागिरीच्या दुधासोबत सुमारे १५०० लोकांनी लाभ घेतला. यावेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया माजी जिल्हाध्यक्ष जयप्रकाश कंलंत्री, डॉ सुरेंद्र कंलंत्री, श्रीनिवास बाहेती, राधेश्याम लोहिया, गोविंद बजाज,राजेंद्र इंदानी संतोषबापू जेथलिया, तालुका सचिव गोपाल मानधने उपस्थित होते. यावेळी संतोषबापू जेथलिया यांनी समाज प्रबोधनपर व्याख्यान दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद जाजू तरं आभार नवल किशोर काबरा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजलगाव माहेश्वरी सभेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम केले.

## पहाडीपारगाव चे निराधार योजना समिती सदस्य बंडुभाऊ मस्के याचे उत्कृष्ट कार्या बद्दल सपत्नीक गौरव



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

तालूक्यातील पहाडी पारगाव येथील माजी सरपंच व सध्या तालुकानिराधार योजना समीतीचे सदस्य बंडूभाऊ मस्के यांनि शासनाचे विवीध योजनाचा लाभ गावातील वंचित ग्रामस्थाना मिळवून दिल्या मुळे त्याच्रा सपत्नीक सत्कार करून गौरव करण्यात आला. त्यांते कार्याचे कौतूक करण्यात आले. धारूर तालुक्यातील श्रावण बाळ निराधार योजनेतून पहाडी पारगाव गावातील शेकडो लोकांना वैयक्तीक समिती सदस्य झाल्या वर लाभ मिळवून देणारे गावचे ज्येष्ठ नेते तथा माजी सरपंच व संजय गांधी निराधार समितीचे धारूर तालुका सदस्य बंडूभाऊ मस्के यांच्यामुळे भोगलवाडी जिल्हा परिषद गटातून आता पर्यंत हजारो लोकांना या योजनेचा लाभ मिळवून दिला. तरी बंडूभाऊ मस्के यांच्या माध्यमातून लाभ मिळाला आहे इथून पुढेही त्यांच्या हातून अशीच लोकांची सेवा घडो यासाठी ग्रामपंचायत पहाडी पारगाव च्या वतीने त्यांचा जिल्हा परिषद शाळा पहाडी पारगाव येथे जाहीर सत्काराचे आयोजन केले आहे. त्याचा त्याच्री पत्नी कस्तूराबाई बंडु मस्के यांच्या सह सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्याच्रे कार्याचा गौरव करण्यात आला यावेळी सरपंच बालासाहेब अंडील, उपसंरपंच हनूमंत मुंडे उत्तमराव ढगे मंच्छिद्र पुर्णे नवनाथ ईरमले उध्दव रुद्रे, अभिमान ढगेआदी सह ग्रामस्त मोठ्या संख्येने उपस्थीत होते.


# माजी आ. केशवराव आंधळे यांचे मार्गदर्शन आणि पुतणे सरपंच अँड. मयुर आंधळे यांचा पाठपुरावा !

## रुई गांवच्या विकासासाठी १ कोटी ५ लाख रुपायाचा निधी मजुंर ; ३५ घरकुलांना देखील मिळाली मंजुरी

**वडवणी । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या सर्व योजना गांवपातळीवर १००% राबविणारी ग्रामपंचायत म्हणून वडवणी तालुक्यातील रुई गांवचा नामउल्लेख होतो. याच गांवच्या विकासासाठी विविध योजने अंर्तगत राज्य सरकारकडून आचारसंहितेच्या अगोदर तब्बल १ कोटी ५ लाख रुपायाचा निधी मंजुर झाला आहे. हा निधी आणण्यासाठी माजी आ. केशवदादा आंधळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे तर याबाबतचा पाठपुरावा पुतणे आणि गांवचे सरपंच अँड.मयुरशेठ आंधळे यांनी केला असून यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेतून गांवतील ३५ लाभार्थी यांना घरकुल देखील मजुंर केले आहेत.

याबाबत आधिक माहिती अशी कि, वडवणी तालुक्यातील मौजे रुई हे गांव पुनर्वसित गाव म्हणून ओळखले जाते. ही ओळख पुसण्यासाठी तसेच गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी या गावचे भूमिपुत्र तथा चौसाळा मतदार संघाचे माजी आमदार केशवदादा आंधळे हे कार्य तत्पर आसतात. यांच्याच मार्गदर्शनाखाली त्यांचे पुतणे एडवोकेट सरपंच मयूरशेठ आंधळे यांची धडपड दिसून

येते. तर राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचा बिगुल वाजण्या अगोदर राज्य सरकारकडून विविध योजनेअंतर्गत निधी मंजूर करुन घेण्याचा काम मयूरशेठ आंधळे यांनी केले आहे. यामध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजने अंतर्गत ३५ लाभार्थीधारकांना घरकुल मंजूर केले आहे. तसेच २५/१५ या शासनाच्या योजने अंतर्गत संपूर्ण गावात एलईडी लाईटसाठी ३० लाख रुपयांचा निधी, तसेच गावातील रस्त्याच्या दोन्ही बाजूने अंडरग्राउंड नाली बांधकामासाठी २५ लाख रुपये, तर रोजगार हमी योजने अंतर्गत पेव्हिंग ब्लॉक बसवण्यासाठी २० लाख रुपये, गावात मूलभूत सोयीसाठी १० लाख रुपये, एमआरजीएस योजने अंतर्गत कॉंक्रिटीकरण रस्ता करण्यासाठी २० लाख रुपये अशा एकूण १ कोटी ५ लाख रुपयांचा निधी गावच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर केला आहे.

### • सरपंच पटलावर मयुर आंधळे

**रुई हे गाव पुर्नवसित गाव म्हणून राज्य शासनाच्या दरबारी आहे. परंतु या गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच नामांकित गावाच्या यादीत रुई गावच नाव विकास मॉडेल म्हणून बसविण्यासाठी या गावचे प्रथम नागरिक तथा उच्चभूषित सरपंच अँड. मयूरशेठ आंधळे नेहमीच कोणते ना कोणते काम करून तालुक्याच्या पटलावर विशेष असा वेगळा ठसा निर्माण केला आहे. मनात इच्छाशक्ती आणि विकासाचा ध्यास ठेवून वाटचाल केली कि कामात यशस्वी नावाचा पासवर्ड नक्कीच पडतो. असं देखण काम मयुरशेठ आंधळे यांच्या हातून ठरत आहे.**

सदरील निधी मंजुर केल्याबद्दल बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे, विधान परिषदेच्या आमदार पंकजाताई मुंडे, मंत्री अतुलजी सावे, मंत्री गिरीशजी महाजन, मंत्री दादासाहेब भुसे या मंत्री महोदयांनी यासाठी विशेष निधी दिल्याबद्दल सरपंच मयुरशेठ आंधळे यांनी विशेष आभार मानले आहेत.

## मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या पाठीशी उभे रहा : माजी सरपंच संतोष चव्हाण

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मतदारांनी विकासाभिमुख नेतृत्व व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या पाठीशी येत्या निवडणुकीत खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन आष्टी मुर्शदपुर सिदेवाडीचे माजी सरपंच संतोष भैय्या चव्हाण यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना माजी सरपंच संतोष चव्हाण यांनी सांगितले की, आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी पहिल्या टप्प्यात १५ वर्ष आमदार असताना मतदारसंघात प्रचंड अशी विकास कामे केली आहेत. पाझर तलाव, वाड्या- वस्त्यांना जोडणारे रस्ते तसेच इतर अनेक विकास कामे केली आहेत. तसेच शेतकऱ्यांसाठी आष्टी ते बीड आष्टी ते मुंबई आणि आष्टी ते दिल्ली असे हजारों शेतकऱ्यांना घेऊन मोर्चे ही काढले आहेत. त्यानंतर पुन्हा वीस वर्षाच्या गॅप नंतर २०१४ मध्ये माजी आमदार भीमराव धोंडे यांची विधानसभेवर निवड झाली. पुन्हा आमदार झाल्यानंतर तर मतदारसंघात कोट्यावधी रुपयांचा निधी आणून रस्ते विकास केला आहे. त्याचप्रमाणे मतदारसंघात शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा गावोगाव पोहोचली आहे.



गावोगावी शाळा महाविद्यालय सुरू केल्याने गोरगरिबांना शिक्षणाची आपापल्या गावातच सोय झाली आहे, तसेच आष्टी सारख्या दुष्काळी भागात आष्टी येथे सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय त्यांनी केली आहे. अशा विकासाची दृष्टी असलेल्या माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या पाठीशी मतदारांनी येत्या विधानसभा निवडणुकीत खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन माजी सरपंच संतोष चव्हाण यांनी केले आहे.

## मुनवर बागवान हरवला आहे



**बीड । प्रतिनिधी**

मुनवर सरवर बागवान हा ३३ वर्षीय तरुण ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ०६:३० वाजल्यापासून शहरातील सय्यद नगर, पांगरी रोड, बीड येथून गायब आहे. या तरुणाचा रंग गोरा असून कोणास दिसल्यास ८०८०६२६२४१ किंवा ९६३७६४७१६१ या भ्रमनध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गेवराई पंचायत समिती गटविकास अधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारताच अशोक राठोड लागले कामाला

**टाकरवण । प्रतिनिधी**

गेवराई येथील पंचायत समिती गटविकास अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारताच अशोक राठोड यांनी मंगळवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून आपल्या कामकाजाला सुरुवात केली आहे. यावेळी पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. तालुक्यातील अनेकांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या.



गेवराई येथील पंचायत समिती कार्यालयाचा कारभार मागील काही महिन्यात मोठ्या प्रमाणावर रेंगाळला होता. यामुळे तालुक्यातील नागरिकांची कामे खोळंबली होती. तत्कालीन गटविकास अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने त्यांच्याविषयी तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यातच त्या चार दिवसांपूर्वीच दिर्घ रजेवर गेल्याने येथील पंचायत समितीचा कारभार पुर्णतः ठप्प झाला होता. दरम्यान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार गेवराई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून अशोक राठोड यांना नियुक्ती देण्यात आली. यानंतर मंगळवारी दुपारी अशोक राठोड यांनी गटविकास अधिकारी म्हणून पदभार स्विकारला. कारभार स्वीकारताच त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली आहे. यावेळी पंचायत समिती प्रशासनाच्यावतीने अशोक राठोड यांचे स्वागत करण्यात आले. गटविकास अधिकारी म्हणून पदभार घेतलेले अशोक राठोड यांनी यापूर्वी गेवराई पंचायत समिती कार्यालयात तालुका कृषी अधिकारी म्हणून अनेक वर्षे काम पाहिलेले आहे. त्यामुळे त्यांना या तालुक्यातील कामकामाचा मोठा अनुभव असून एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची तालुक्यात ओळख आहे. त्यांनी गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्विकारल्याने तालुक्यातील अनेकांनी प्रत्यक्ष भेटून अशोक राठोड यांचे स्वागत केले आणि पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या.

### जनतेच्या कामांना प्राधान्य देणार

**अशोक राठोड यांनी गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारला आणि कार्यभार स्वीकारताच कामकाजाला सुरुवात केली. गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेची पंचायत समिती स्तरावरील विविध कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी आपले प्राध्यान्य असेल, असे अशोक राठोड यांनी यावेळी सांगितले.**

## जगन खेञी यांनी माजलगाव विधानसभा लढवावी समता सैनिकाची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात उमेदवारांची भाऊ गर्दी झाली असून अनेक जण नशीब अजमवन्यासाठी पुढे येत आहेत जे कधीही सर्वसामान्यांसाठी नाही जनतेसाठी रस्त्यावर उत्तरे नाही किंवा कामी आले नाही असे लोकही म्हणतात मला आमदार करा अनेक उमेदवाराच्या भाऊ गर्दीत माजलगाव तालुक्यातुन ओबीसीचा आमदार होऊ शकतो असा काय अस करून जगन खेञी यांनी पूर्ण ताकदीनिशी माजलगाव विधानसभा लढवावी अशी मागणी ओबीसी मतदारातून व्यक्त केली जात आहे



माजलगाव मतदार संघातून आमदार प्रकाश सोळंके यांचे पुतणे जयसिंग सोळंके अजित पवार गट मोहनराव जगताप अपक्ष रमेशराव आडसकर शरद पवार गट माधव निर्मळ आणखी ठरलं नाही बाबरी मुंडे आणखी ठरल नाही आधी पाच उमेदवारांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे मात्र यातील काही जण माघारही घेतील शेवटी तीन उमेदवार राहतील अशा परिस्थितीमध्ये धन दांडग्याच्या टकरी मध्ये ओबीसी उमेदवार निवडून येण्याची दाट शक्यता आहे लोकसभेत माघार घेतली विधानसभा तरी पूर्ण ताकदीनिशी लाडवावी अशी मागणी ओबीसी समाजाच्या वतीने होत आहे


### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १५३०/२०२४**
**सोजर व ईतर विरुध्द निरंक**
**अँड. टि. व्ही. जाधव**

अर्जदार :- (१) सोजर विठ्ठल वराट, वय ७३ वर्ष, धंदा घरकाम, पत्ता वराट गल्ली, साकत ता. जामखेड जि. अहमदनगर, (२) अनुबाई परमेश्वर पौळ, वय ५६ वर्ष, धंदा घरकाम लोणीघाट ता.जि.बीड, (३) विजाबाई कल्याण जगताप, वय ५३ वर्ष, धंदा घरकाम पालसिंगण ता. जि. बीड

विरुध्द

मागणी अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत जनार्धन नरहरी जोगदंड** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत जनार्धन नरहरी जोगदंड यांचा मृत्यु दि. २३/१२/२००३ रोजी चौसाळा, वा जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क १ ते ३ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी, आई व वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्या सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदर मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदर अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत जनार्धन नरहरी जोगदंड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६ माहे ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३० नोव्हेंबर २०२४.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक — शिक्का — (स्वाक्षरीत) अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड



### जाहीर प्रगटन

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :- १४४६/२०२४**
**( मार्फत विधिज्ञः - श्री एस बी खाडे)**

अर्जदार :- १. मोहरबाई भिमराव ढास, वय - ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. मुळुकवाडी, ता. जि. बीड २. अशोक भीमराव ढास, वय - ३८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. भास्कर भीमराव ढास, वय - ३३ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ४. प्रिया प्रविण घरत, वय - ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. महाजनवाडी ता. जि.बीड, ५.रेखा भगवान कदम, वय - ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सौंदाणा ता. पाटोदा जि.बीड,

विरुध्द निरंक

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे भिमराव बापुराव ढास हे/ या दि. ०५/०२/२०२४ रोजी राहते घरी मुळुकवाडी ता. जि.बीड येथे मयत असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र ४ व ५ या मयताच्या विवाहित मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांकः- १४/१०/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीखः- १६/११/२०२४.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक — शिक्का — (स्वाक्षरीत) अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड


## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाच्या युवक रा कॉं च्या पदाधिकाऱ्यांची तसेच

## अल्पसंख्याक आष्टी शहराध्यक्षपदी जिशान सय्यद यांची निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाच्या व युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या विविध पदांच्या कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांच्य मार्गदर्शनाखाली अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष राहुल काकडे यांच्याहस्ते शनिवार दि १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथे अल्पसंख्याक विभागाच्या आष्टी शहराध्यक्षपदी जिशान सय्यद यांची तर अल्पसंख्याक तालुका उपाध्यक्षपदी शब्बीर शेख व युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका सचिवपदी शहाजी भोसले तर जोगेश्वरी पारगाव गण प्रमुखपदी सतीश जेवे, सहाय्यक गणप्रमुखपदी लक्ष्मण जगताप यांची निवड करण्यात आली आहे.




आष्टी शहरातील सामाजिक क्षेत्रात व अल्पसंख्याक समाजाच्या व युवकांच्या प्रश्नांवर सतत आवाज उठवणारे अडीअडचणीत साथ देणारे जिशान सय्यद यांची ओळख असून त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, अल्पसंख्याक यांच्या मान्यतेने अल्पसंख्याक विभागाचे बीड जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख व राष्ट्रवादी काँग्रेस युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष राहुल काकडे यांच्या हस्ते अल्पसंख्याक विभागाच्या आष्टी शहराध्यक्षपदी जिशान सय्यद यांची तर अल्पसंख्याक विभागाच्या तालुका उपाध्यक्षपदी शब्बीर शेख तर युवक काँग्रेसच्या तालुका सचिवपदी शहाजी भोसले, जोगेश्वरी पारगाव युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या गणप्रमुखपदी सतिश जेवे, सहाय्यक गणप्रमुखपदी लक्ष्मण जगताप यांची नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आणि त्यांचे स्वागत केले. यावेळी सामाजिक न्याय विभाग तालूका अध्यक्ष अतुल शिंदे, तौफिक शेख,भैरव चव्हाण, जल्लाल शेख, हाफिज मोसिम सय्यद, मुजामिल शेख, अरबाज बेग, महम्मद शेख, गणेश धुमाळ, जुबेर सय्यद, आबेद सय्यद, अजिम खान, जहिर काझी, चांद. खा. पठाण,अरबाज कुरेशी,अदनान सय्यद,इंनुस मामु, आनंद भालेराव, शकील पठाण बब्बू खान, सादिक शेख, हनु जेवे, रमेश जेवे, सुलतान सय्यद, जाहीर पठाण, अतीक कुरेशी,समीर पठाण,मुजामिल सय्यद, मोहसीन पठाण,जमीर पठाण, आसिफ सय्यद, तयुब सय्यद, प्रवीण जेवे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीबद्दल माजी आ साहेबराव दरेकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ॲड नरसिंह जाधव,विधानसभा अध्यक्ष राम खाडे, तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, अण्णासाहेब चौधरी, किशोर हंबर्डे, अमोल तरटे, युवक प्रदेश सचिव ॲड रिजवान शेख, युवक तालुका अध्यक्ष ऋषिकेश दरेकर, संतोष सानप, किशोर मुळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले.

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com रविवार, दि. २० ऑक्टोबर २०२४ पान ४

# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955

## टिप्परने उडवल्याने महिलेचा जागीच मृत्यू

**बीड** – मोटार सायकल वर मांजरसुंबा कडे जाणाऱ्या दुचाकी स्वाराला टिप्परने धडक दिल्यामुळे महिलेचा जागीच मृत्यू झाला तर मोटर सायकल स्वार जखमी झाला आहे. ही घटना बार्शी नाका बायपास चौकात घडली. मांजरसुंबाकडे मोटार सायकल क्र. एम एच २३ ए एच ८४३५ ने जात असणाऱ्या दोघांना जगदंबा स्टोन क्रेशर चे टिप्पर क्र. एम.एच.२३–एयू–४६७० ने जोराची धडक दिल्याची घटना दुपारी बायपास रोडवर घडली यामध्ये सदरील महिलेचा जागीच मृत्यू झाला अन्य एक जखमी झाला असून टिप्पर सोडून चालक फरार झाला. अपघात झाला त्यावेळी लोकांनी एकच गर्दी गेली होती.सदरील महिलेचा मृतदेह जिल्हा रूग्णालयात आणण्यात आला असून जखमीवर रूग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

महत्वाचे...

## कला क्रीडा केंद्रातील तिरटच्या जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण आणि सांस्कृतिक माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंबाजोगाई शहरातील एका कला क्रीडा केंद्रावर पोलिसांनी छाप्पा मारून तब्बल ५० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी या कारवाईसाठी सपोनि बाळराजे दराडे,पोलीस उपनिरीक्षक श्री. विघ्ने यांच्यासह काही कर्मचाऱ्यांची पथकासाठी नेमणूक केली होती. अंबाजोगाईतील अंबासाखर कारखाना शेजारील उड्डाणपुलाजवळ राज कला क्रीडा केंद्र असून येथे तिरट नावाचा जुगार अड्डा सुरु झाला होता. याची माहिती पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांना मिळाल्यानंतर त्यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यातील सपोनि बाळाराजे दराडे, स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक श्री. विघ्ने यांच्यासह काही कर्मचाऱ्यांना सदर ठिकाणी छापा मारण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलिसांनी या ठिकाणी काल रात्री छापा मारला असता २३ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. तर नगदी रोक्कड ५ लाख ७६ हजार ६०० रुपयांसह स्कर्पिओ गाडी, काही दुचाक्या, इतर साहित्य असा ५० लाख ३१ हजार १७६ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. जुगार अड्ड्यावरील मागच्या अनेक दिवसातील ही मोठी कारवाई असून यामुळे अवैध धंद्यावल्याचे धाबे दणाणले आहेत. मटका,जुगार अड्डे, अवैध फटाक्यांचे गोदाम गोदापात्रातील अवैध वाळू तस्करी, गुटखा तस्करी यासारख्या वाढलेल्या गुन्हेगारीवर वचक बसवण्यासाठी विशेष पथकाचे विलास हजारे, गणेश मुंडे यासारख्या अधिकाऱ्यांनी जीवाचे रान केले होते. त्यांनी आपला दरारा ही निर्माण केला होता. बाळराजे दराडे यांनी देखील त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून कारवायांचा धडाका लावत पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांचा विश्वास सार्थ ठरवला आहे. त्यामुळे दराडेंवर विशेष पथकाची जबाबदारी सोपवण्यात यावी अशी मागणी जनतेतून होऊ लागली आहे.

## अंगावर पेट्रोल टाकून एकास जिवंत जाळण्याचा प्रयत्न

**केज । प्रतिनिधी**

पती – पत्नीत असलेल्या प्रॉपर्टीच्या वादातून एका व्यक्तीस त्याच्या पत्नी, मुलीने इतरांच्या मदतीने अंगावर पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना केज शहरात घडली. याप्रकरणी पत्नी, मुलीसह इतर ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. केज शहरातील फुलेनगर भागातील नितीन शाहूराव काळे (वय ४१) व त्यांची पत्नी प्रतिभा नितीन काळे या दोघा पती – पत्नीमध्ये मागील एक वर्षांपासून प्रॉपर्टी वाद आहे. त्यांना दोन मुली व एक मुलगा अशी तीन अपत्ये आहेत. नितीन हे १५ ऑक्टोबर रात्री ७ वाजेच्या सुमारास पानमटेरियलच्या दुकानावर असताना त्यांची पत्नी प्रतिभा काळे, मुलगी सिद्धी काळे, विशाल दत्तात्रय मस्के, बाबा पठाण हे चौघे दुकानावर आले. प्रतिभा हिने त्यांना दुकानाच्या बाहेर ये म्हणत शिवीगाळ करू लागल्याने नितीन यांनी शिवीगाळ करू नको म्हणत दुकानाबाहेर आले. त्यांना विशाल मस्के, बाबा पठाण, मुलगी सिध्दी या तिघांनी पकडले.

# भटक्या – विमुक्त मागासवर्गीय समाज बांधवांचा एकच निर्धार भिमराव धोंडेच पुन्हा आमदार

### विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरणार : मा. आ.भिमराव धोंडे; भव्य रॅलीने आष्टी शहर दणाणले

**आष्टी । प्रतिनिधी**

पुढच्या महिन्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघातील मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जाती जमाती समाज बांधवांचा संवाद महामेळावा संपन्न झाला. मेळाव्याच्या निमित्ताने मा.आ. भिमराव धोंडे यांना एकमुखी पाठिंबा दिला.यावेळी झालेल्या प्रचंड रॅलीने आष्टी शहर दणाणले .

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातील मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जाती जमाती समाज बांधवांच्या संवाद महामेळाव्याचे आष्टी येथे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे हे होते. संवाद मेळाव्याच्या निमित्ताने आष्टी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून समाज बांधवाची भव्य रॅली काढण्यात आली. वेशीतून शनि चौक, किनारा चौकातून खडकत रस्त्याने भव्य रॅली लक्ष्मी लॉन मध्ये पोहोचली.



कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे, भाजपा तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के, ॲड. रत्नदिप निकाळजे, युवा नेते अभयराजे धोंडे, जि. प. सदस्या वर्षा माळी, हरिभाऊ जंजिरे, माजी जि. प. सदस्य अशोक सव्वाशे, अशोक खोले, दिलीपराव म्हस्के, माजी सरपंच बाळासाहेब पवार, भाजपा जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख, संजय कांकरिया, महाराष्ट्र राज्य भटक्या विमुक्त संघटनेचे उपाध्यक्षा ॲड. भाग्यश्री ढाकणे, भाजपा किसान सभेचे अध्यक्ष बबनराव ओटे, युवराज सोनवणे, भटक्या विमुक्त विकास संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत धनवटे, उपाध्यक्ष गोवर्धन जाधव,पाटोदा तालुका उपाध्यक्ष नवनाथ विटकर, आष्टी तालुकाध्यक्ष अविनाश विटकर, पोपट धनवडे, एकलव्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे,भाजपा तालूका उपाध्यक्ष रघुनाथ शिंदे,विकी शेकडे, शहराध्यक्ष बाबुराव कदम, चेअरमन राजेश धोंडे, सरपंच दादासाहेब जगताप, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस व इतरांची उपस्थिती होती. महामेळाव्यात बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, मतदारसंघात सर्व जाती धर्माचे लोक राहतात. भटक्या विमुक्त व मागासवर्गीय समाजातील लोकांनी आपल्या मुलांना चांगले उच्च शिक्षण द्यावे. सर्वांगिण विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. छत्रपती शिवाजी महाराज,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,

▶▶ उर्वरित पान २ वर

## व्यापाऱ्यांना ठामपणे संरक्षण देण्याचं काम मी केले ; कुणी कितीही वल्गना करुद्या कितीही समोर येऊ द्या

# जो पर्यंत सर्वसामान्य माणूस माझ्या सोबत आहे मी तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही : सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

माझ्याकडे या मतदार संघाचा डेवोलपमेंट प्लॅन आहे सुजलाम सुफलाम हा मतदार संघ करण्याचा माझा पहिल्या पासून माणसं आहे. तुम्ही संधी दिल्यास हे सर्व मी करून दाखविणार आहे.कुणी कितीही वल्गना करुद्या कितीही समोर येऊद्या जो पर्यंत गोरगरीब, सर्वसामान्य जनता माझ्या सोबत आहे मी तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही म्हणत आ.सुरेश धस यांनी आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याबाबत स्पष्ट संकेत दिले आहेत.गुरुवारी शहरातील मोरेश्वर लॉन येथे आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यातील व्यापारी बांधवांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष संजय मेहेर शिरूर नगराध्यक्ष रोहिदास पाटील, मधुसूदन खेडकर, डॉ.बडजाते, अभिजीत डूगरवाल, फैयाज भाई, अशोक तळेकर, गोरख कर्डिले, संतोष भंडारी, संपत शेळके, नागेश कर्डिले, हरून शेठ, शहादुला बेग, हेमंत पोखरणा, योगेश भंडारी, दर्शन कांकरिया, रतिलाल कटारिया, कल्याण भोसले, अजित बोरा यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना धस म्हणाले की,ज्या वेळी कडा बाजारपेठ माझ्या ताब्यात आली त्या वेळी साधं पोताड्याच हॉटेल असणार कडा मार्केट आज त्या मार्केटचा कांदा दुबईला जात आहे.परळी येथे खत साठा करायचे रॅक होते. ते अहील्यानगराला आणण्याचे काम मी केले. त्यामुळे वाहतूक कमी होऊन व्यापाऱ्यांना ते सोयीस्कर मिळण्यास मदत झाली.खताचा पुरवठा वारंवार आपल्याला कमी मिळत होता



त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून तो पुरवठा व्यवस्थित करण्यासाठी प्रयत्न केला.आज एकही कृषी दुकानदाराची खताच्या कम तरतेबाबत तक्रार नाही. व्यापाऱ्यांमध्ये किमान ८ दिवसातून एकदा बसून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतो त्याच निरसन करण्याचं काम करतो.आयुष्यात मदत करताना कधीच हिशोबाची डायरी ठेवली नाही. म्हणूनच लाखोंनी माणसं जोडत गेली. ती आजही सत्ता असो अथवा नसो ती कायम माझ्यासोबत आहेत हीच माझी संपत्ती असल्याचे सांगत मच्छिंद्रनाथ गडावर २१ कोटी रुपयांची विकास काम

▶▶ उर्वरित पान २ वर



*शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब मुख्यमंत्री व्हावेत व बीड जिल्हा शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख भावी आमदार बदामराव आबा पंडीत यांचे हात बळकट करण्यासाठी युवा नेते मनोज डोंगरे पाटील सह दामोदर मोरे, रितेश मुळे, सुरज पाडुळे, अविनाश खरात, विशाल हिवटे, आदर्श गव्हाणे गेवराई ते श्री.क्षेत्र तुळजापूर पायी वारी करत जगदंबे चरणी साकडे घालण्यासाठी चालले असता आज बीड शहरात जात असताना त्यांचे अभिनंदन करत बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व गणेश भाऊ वरेकर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, सखाराम तात्या मोहिते,विनोद गुंड पाटील,दीपक घोडके पाटील, अजय गायकवाड, अय्युब भाई पठाण,ऋषी भैय्या गिरी, बापू सातपुते,गोरख भटे,राकेश ढोले, रत्नाकर येवले उपस्थित होते...!!*

# काकू–नाना प्रतिष्ठानचा फिरतादवाखाना ग्रामस्थांच्या आरोग्यास लाभदायी

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते माजी मंत्री जयदत्त (आण्णा) क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू–नाना प्रतिष्ठान, राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष, तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय यांच्या समन्वयाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर बीड तालुक्यातील चौसाळा सर्कल मधील वाढवणा येथे दिनांक १९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले. वाढवणा गावात आयोजित शिबिरात ग्रामस्थांमध्ये




सर्दी, खोकला, ताप, सांधेदुखी, अंगदुखी यांसारख्या आजारांचे प्रमाण निदर्शनास आले.

शिबीराचे वैशिष्ट्य म्हणजे तज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून मोफत सामुदायिक आरोग्य तपासणी, विनामूल्य रक्त, लघवी, ईसीजीची तपासणी, गरज भासल्यास विनामूल्य रुग्णवाहिका याबरोबरच आयुष्यमान भारत कार्ड सुविधा डॉ.मीनल गजभिये डॉ.भाग्यश्री दगडे, डॉ.प्रमोद सोनकांबळे, डॉ. प्रिया गुरखुदे यांनी ग्रामस्थांच्या आरोग्याची तपासणी केली. काकू–नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्रचार्य तथा कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अंजली क्षीरसागर अमृता आगवान,

▶▶ उर्वरित पान २ वर

## पैशाचा पाऊस पाडतो असं सांगत ४५ लाखाला घातला गंडा

### सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

तंत्र विद्या अवगत असल्याचे सांगून पैशाचा पाऊस पाडून तुला मालामाल करतो असे आमिष दाखवत लॅब टेक्निशियन ची ४५ लाखाहून अधिकच्या रकमेला गंडा घातल्याचा प्रकार बीड शहरात उघडकीस आला


या प्रकरणी सहा जणांविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेख अझहर शेख जाफर रा.भारतभूषण नगर, बालेपीर नगर रोड बीड याला पैशाचा पाऊस पाडून तुला मालामाल करतो, असे आमिष हमीद खान ऊर्फ बाबू करीम खान व इतरांनी दिले. या मांत्रिकांनी शेख अझहर याच्याकडून रोख २४ लाख व फोन पे द्वारे २१ लाख २३ हजार ३१५ रुपये उकळले. आपली याच्यामध्ये फसवणूक झाल्याचे शेख अझहर यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या प्रकरणी हमीद खान ऊर्फ बाबू करीम खान रा.जे.के. कॉम्प्लेक्सच्या मागे बार्शी नाका बीड, जिलानी अब्दुल कादर सय्यद रा. मोमीन गल्ली ता.औसा जि. लातूर,सविता पवार रा. पुंडलिक नगर औरंगाबाद, शेख समीर शेख अहमद रा. जालना,उत्तम भागवत रा. घोलपवाडी ता. इंदापूर जि. पुणे, प्रकाश गोरे रा. झारकरवाडी ता. इंदापूर जि. पुणे या सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# न लढल्यास भाजपचा सुपडासाफ होणार हे खरे; पण आंदोलनही खिळखिळे होणार!: शिवाजी कवठेकर

**बीड । प्रतिनिधी**

न लढल्यास भाजपचा सुपडा साफ होणार हे निश्चित.पण हे काही आंदोलनाचं ध्येय नाही. कारण, ओबीसीतून आरक्षण मिळवण्यासाठी आंदोलन उभं राहिलेलं आहे.शिवाय भाजपचा सुपडासाफ झाल्यानंतर जे सत्तेवर येणार आहेत,ते काही ओबीसीतून आरक्षण देणार नाहीत.कारण आज सत्तेवर नसतानाही, ते मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्या! असं साधं म्हणायलाही तयार नाहीत.फडणवीस ब्राह्मण आहेत म्हणून त्यांच्या विरुद्ध रान उठवणे खूप सोपे आहे.पण हेच निवडणुकी नंतरच्या परिस्थितीत मराठा असल्यामुळे खा शरद पवारांविरुद्ध तुम्ही काही बोलू शकणार नाहीत; किंवा त्यांचे काही करू शकणार नाहीत. त्यामुळे न लढण्याचा निर्णय घेऊन फक्त भाजपच संपणार आहे असं नाही, तर आंदोलनाची विश्वासार्हताही संपण्याचा धोका त्यात आहे.तसे जरांगे पाटील खूप प्रगल्भ आहेत.पण आंदोलनाच्या १४ महिन्यानंतरच्या आजच्या परिस्थितीत, निवडणूक न लढवण्याचा निर्णय जर मनोज जरांगे पाटलांनी घेतला, तर त्याला फक्त अविचारच म्हणावा लागेल,असे आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने




प्रसिद्ध केलेल्या पत्रकात अध्यक्ष शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

पत्रकात असे म्हटले आहे की,निवडणूक लढवण्यापेक्षाही महायुतीचा पराभव महत्त्वाचा मानून जरांगे पाटलांनी लोकसभा निवडणूक लढवण्यास महत्त्व देऊ नये, असे आम्ही लोकसभा निवडणुकीपूर्वीच लिहिले होते. कारण मार्च अखेरपर्यंत जरांगे पाटलांवर टीका करणारे भाजपचे नेते एप्रिल महिन्यात मात्र अचानकपणे जरांगे पाटील व त्यांच्या निवडणूक लढवण्याच्या विचाराचे कौतुक करू लागले होते.म्हणजे फडणवीस व भाजपला हे चांगल्या प्रकारे कळत होते की, जरांगे पाटलांनी आपले उमेदवार दिल्यास त्यांना मराठा समाजाचे मतदान एकतर्फी होईल व उर्वरित मतांमध्ये आपण महाविकास आघाडीला सहज गुंडाळू शकतो.असा भाजपचा विश्वास असल्यामुळे जरांगे पाटलांना कौतुक करून निवडणूक लढण्यास भरीस पाडण्याकरिता भाजपचे प्रयत्न चालू झाले होते. पण जरांगे पाटलांनी न लढण्याचा योग्य निर्णय घेतला व भाजपचे मनसुबे हाणून पाडले.पण त्यामुळे पक्ष म्हणून भाजपचा किती मोठा पराभव झाला हे आपल्याला माहित ▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK